# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### सातारा जिल्हयात डॉक्टर्सची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) १३२२५ (१०-०९-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयाची लोकसंख्या ४० लाख इतकी असताना जागतिक मापदंडानुसार १ लाख लोकसंख्येमागे किमान १०० डॉक्टर्स उपलब्ध असणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सध्या सातारा जिल्हयात २६१ सरकारी तर १ लाख १३६ खासगी डॉक्टर्स असून जिल्हयात एकूण प्रमाणाच्या ६० टक्के डॉक्टर्सच उपलब्ध नसल्याचे दिनांक २७ मे,२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सातारा जिल्हयात राष्ट्रीय दर्जाचे रुग्णालय व प्रयोगशाळा उभारणीबाबत गेल्या अनेक वर्षापासून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सध्याच्या कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या संकट काळात व जिल्हयातील कोरोना रुग्णांची दिवसेंदिवस वाढती संख्या लक्षांत घेता पुरेशा प्रमाणात डॉक्टर्स, परिचारिका व आरोग्य कर्मचारी यांची सातारा जिल्हयात तातडीने नियुक्ती करण्यासह जिल्हयात राष्ट्रीय दर्जाचे रुग्णालय व प्रयोगशाळा उभारणीबाबत गेल्या अनेक वर्षापासून करण्यात येत असलेल्या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२८-०२-२०२३) :** (१) सातारा जिल्ह्याची लोकसंख्या ३१.७९ लक्ष एवढी आहे तसेच Journal of family medicine and primary care (Raman Kumar, Ranbir Pal, President Academy Physicians) यानी प्रसिद्ध केल्यानुसार ( संदर्भ Global health Observatory data) नुसार १००० लोकसंख्येस १ डॉक्टर असावे असे प्रमाणक ठरविण्यात आले आहे.

(२) सातारा जिल्ह्यात ५२६ शासकीय व १०१० खाजगी डॉक्टर कार्यरत आहेत, हे खरे आहे.

(३) राष्ट्रीय दर्जाचे रूग्णालय व प्रयोगशाळा उभारण्याबाबत निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) कोरोना विषाणू संसर्गाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेमार्फत कंत्राटी डॉक्टर्स व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सातारा शहरात शिवाजी संग्रहालय येथे जंबो कोविड रूग्णालय स्थापित करण्यात आले आहे. जिल्हा रूग्णालयात कोविड विषाणूच्या तपासणी करीता प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे.

(५) लागू नाही.

---

### नागपूर-अमरावती (जि.नागपूर) रोडवरील कोविड रुग्णालयास आग लागून रुग्णांचा झालेला मृत्यु

**(२) २७६२१ (१२-०६-२०२१). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण),**

**श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-अमरावती (जि.नागपूर) रोडवरील वाडी येथील पुजा चेम्बर्स बिल्डिंग मध्ये सुरु असलेल्या वेल ट्रिट कोविड रुग्णालयाला रात्री अचानक भीषण आग लागून त्यामध्ये ४ रुग्णांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक ९ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आग कशामुळे लागली याबाबत अग्निशमन दलासह पोलीस तपास करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अग्निशमन दलाने कोणते अभिप्राय नोंदविले आहेत तसेच पोलीस तपासातही काय निष्पन्न झाले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे तसेच मृत रुग्णांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०२-२०२३) : (**१) हे खरे आहे.

(२) होय

(३) व (४) हॉस्पिटलच्या आय.सी.यु. वॉर्ड मधील एसीवर अतिरिक्त भार येवून ते ओव्हर हिटींग झाल्यामुळे स्पार्कींग झाले असल्याची शक्यता अग्निशामन दलाने वर्तवली आहे. याबाबत पोलीस यंत्रणा व अग्नीशामन दल यांनी चौकशी केली असता हॉस्पिटल प्रशासनाने योग्य क्षमता मानकानुसार विद्यूत उपकरणे वापरली नाहीत. आग विजवण्याचे साहित्य व आपत्कालिन मार्ग ठेवले नाहीत. असे अभिप्राय नोंदविले आहेत. पोलीस विभागाने याबाबत फिर्यादीची कायदेशीर तक्रार घेवून हॉस्पिटल प्रशासनाविरुद्ध पो.स्टे. वाडी येथे गुन्हा क्र. १२७/२१ क्र. ३०३,३४,भा.द.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मुंबई नर्सीग होम ॲक्ट, १९४९ नुसार सदर हॉस्पिटलने दि.३१.०३.२०२१ रोजी रुग्णालय नुतनीकरणाचा प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर यांच्याकडे सादर केला होता. सदरहू घटना घडली त्यावेळी नुतनीकरण परवाना नसताना हॉस्पिटल चालू होते. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी रुग्णालयाची नोंदणी रद्द करण्याचे आदेश दि. ०९.११.२०२२ रोजी पारित केले आहेत. तसेच याबाबत प्राप्त अपील फेटाळून जिल्हा शल्यचिकित्सक यांचे आदेश कायम केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयात कायमस्वरूपी वैद्यकीय अधीक्षक यांची नियुक्ती करणेबाबत**

**(३) ३३६४१ (१०-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील १६ उपजिल्हा रुग्णालया पैकी १३ उपजिल्हा रुग्णालयात कायमस्वरूपी वैद्यकीय अधीक्षक नसल्याची बाब माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे असलेले प्रभारी अधिकारी हे आरोग्य विषयक निर्णय घेण्यास असमर्थता दर्शवित असल्यामुळे रुग्णांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वातावरणातील बदलांमुळे जिल्ह्यात साथीच्या आजारात वाढ होत असून विविध आजारांचे तज्ञ डॉक्टर शासकीय रुग्णालयात उपस्थित नसतात , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास. वैद्यकीय अधिकारी व तज्ञ डॉक्टर नसणे तसेच औषधांचा तुटवडा यामुळे वेळप्रसंगी रुग्णांचा मृत्यू होत असल्याचे देखिल निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नांदेड जिल्हयातील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णाची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी कायमस्वरूपी वैद्यकीय अधीक्षक यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२३-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्हयामध्ये एकूण ५ उपजिल्हा रुग्णालय व ११ ग्रामीण रुग्णालये कार्यान्वीत आहेत. त्यापैकी ३ उपजिल्हा रुग्णालय व ६ ग्रामीण रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिक्षकांचे पद भरण्यात आलेले आहे. उर्वरीत रुग्णालयातील अधीक्षकाच्या अतिरीक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ अंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू असून आयोगामार्फत उपलब्ध होणाऱ्या उमेदवारांमधून नांदेड जिल्हयातील वैद्यकीय अधीक्षकाची रिक्त पदे भरण्यात येतील.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मांढळ (ता.कुही,जि नागपूर) येथे डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे शेतेक-याचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४) ३३८३९ (१०-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांढळ (ता.कुही,जि नागपूर) येथे शेतावर फवारणीचे काम करीत असताना श्री. गंगाधर रामाजी मुटकुरे या शेतकऱ्याचा पायाला साप चावल्यामुळे उपचारादरम्यान डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे प्राण गमवावा लागला असल्याचे माहे ऑक्टोबर २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री मुटकुरे ह्यांना त्याचा भावाने मांढळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले असता तेथील बाहय रुग्ण विभागातील (ओपीडी) डॉक्टर डांगोर ह्यांनी त्यांना टेग्जा व विनंटा ही इंजेक्शन दिली परंतु त्यांच्यावर जखमी पायाचे ड्रेसिंग केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, श्री. मुटकुरे ह्यांच्यावर मांढळ प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार न मिळाल्याने कुही ग्रामीण रुग्णालयात नेले असता तेथे सुद्धा त्याच्यावर वेळेवर उपचार न झाल्याने त्याचा मृत्यू झाला , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत मांढळ प्राथमिक आरोग्य केंद्र व कुही ग्रामीण रुग्णालयाच्या डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०१-२०२३) :** (१) रुग्णाचा मृत्यू झाला परंतु तो डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे झाला हे म्हण खरे नाही.

(२) हे खरे नाही, ड्रेसिंग करण्याइतपत जखम नव्हती किंवा रक्तस्त्राव देखील होत नव्हता.

(३) हे खरे नाही,

प्राथमिक आरोग्य केंद्र, मांढळ आणि ग्रामीण रुग्णालय, कुही येथे सदर रुग्णावर उपचार करण्यात आला व रुग्णास पुढील उपचारासाठी संदर्भसेवा पुरविण्यात आली.

(४) श्री. मुटकुरे यांचेवर प्राथमिक आरोग्य केंद्र, मांढळ आणि ग्रामीण रुग्णालय, कुही येथे आवश्यक औषधोपचार करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे,) येथील ग्रामीण भागात मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(५) ३४०५३ (०६-०१-२०२२) श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे,) विधानसभा मतदारसंघ येथील ग्रामीण भागात मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे नागरिकांचे आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खानापूर, कोंढणपूर व सिंहगड आणि पानशेत रस्त्यावर दुतर्फा साचलेला कचरा रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, शासनाकडून उक्त परिस्थितीची पाहणी करण्यात आली आहे काय व पाहणीच्या अनुषंगाने काय निदर्शनास आले आहे,

(४) असल्यास उक्त ठिकाणी कचरा व्यवस्थापनाचा गंभीर प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, उक्त परिस्थितीची पाहणी करण्यात आली असून ग्रामपंचायतींनी सदर ठिकाणचा कचरा उचलून योग्य व्यवस्थापन केले आहे. सदर पाहणीच्या अनुषंगाने कचरा व्यवस्थापन आणि त्यातील सातत्य ठेवण्यासंदर्भात ग्रामपंचायतींना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना कोणताही प्रकारचा त्रास सहन करावा लागत नाही.

(४) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत केंद्र शासन व राज्य शासनाने निर्गमित केलेल्या मागदर्शक सूचनांनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीला कचरा व्यवस्थापन करण्यासाठी सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, गावांमधील घन कचरा व्यवस्थापन आणि ओला व सुका कचरा उचलण्याचे काम खाजगी संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे. गंजाड (ता.डहाणू जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दतील महालपाडा येथील सर्वे नं ६ व गावठण जागेवर झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(६) ३६१४२ (०६-०१-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे. गंजाड ( ता.डहाणू, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दतील महालपाडा येथील सर्वे नं ६ व गावठण जागेवर सुभाष नेमिचंद कर्नावट (डहाणू) या व्यापाऱ्याने पोहामिल, भातगिरणी, पिठगिरणी, मिरची मसालागिरणी या स्वरूपाचे पक्के बांधकाम करून सर्वे नं.६ व गावठण जागेवर अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी जिल्हाअधिकारी पालघर व सहाय्यक जिल्हा अधिकारी डहाणू, तहसीलदार, डहाणू, ग्राम पंचायत गंजाड यांच्याकडे वारंवार तक्रार करून देखील प्रशासनाने आजपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे, काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१६-०२-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही .

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंचोली भू. (जि.उस्मानाबाद) येथील चौधरी दांपत्यांच्या मुलास जन्मदाखला मिळण्याबाबत.**

**(७) ३७७५१ (१३-०४-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोली भू. (जि.उस्मानाबाद) येथील चौधरी दांपत्यांस दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, बोरामणी (जि.सोलापूर) येथे जन्म झालेल्या दुस-या बाळाचे नाव पंतप्रधान असे ठेवले व त्याचा जन्मदाखला मिळविण्याकरीता त्यांनी दि.२७ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासूमारास आरोग्य केंद्राकडे अर्ज केला असतांना त्यांना "पंतप्रधान" हे संविधानीक पदनाम असल्यामुळे हे नाव बालकास द्यावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मिळविण्यासाठी आरोग्य केंद्राने सोलापूरच्या जिल्हा निबंधक, जन्म-मृत्यू तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एक महिन्याचा कालावधी उलटून गेला तरीही याप्रकरणी आरोग्य केंद्रास मार्गदर्शन मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौधरी दांपत्यांना दिनांक १९ जून, २०२० रोजी झालेल्या पहिल्या बालकाचे नाव त्यांनी ''राष्ट्रपती'' असे ठेवून त्याचा जन्मदाखला त्यांना मिळाला परंतू दुस-या दांपत्याचा जन्म दाखला किती कालावधीत मिळण्याची अपेक्षीत आहे?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ) तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि. १४/०२/२०२२ च्या पत्रानुसार मार्गदर्शन करण्यात आले आहे.
(३) दि. १५/०२/२०२२ रोजी जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

---

**पालघर जिल्हयातील आरोग्य यंत्रणेच्या दुरावस्थेबाबत**

**(८) ३७८१० (२४-०४-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील पालघर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात तब्बल ५० टक्के जागा रिक्त असल्याने अपु-या मनुष्यबळाअभावी जिल्हयाच्या आरोग्य व्यवस्थेवर ताण पडत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी जिल्हा परिषदेच्या एकूण २ हजार ७२ मंजुर पदांपैकी केवळ १ हजार १०३ पदे उभारण्यात आले असून तब्बल ९६९ पद रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याचप्रमाणे जिल्हा सिव्हील रुग्णालयाचे काम निविदा स्तरावर असल्याने ते पूर्ण होण्यासाठी अजूनही ३ ते ५ वर्षांचा कालावधी लागणार असल्याचे देखिल निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पालघर जिल्हयातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरुन अद्यावत आरोग्य यंत्रणा पुरविण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-०२-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत माहे जानेवारी, २०२२ अखेर निव्वळ रिक्त पदांची टक्केवारी ४१.३० एवढी आहे.
(२) हे अंशतः खरे आहे. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत एकूण २०७२ मंजूर पदांपैकी १०८८ पदे नियमित स्वरुपात व १२८ पदे कंत्राटी स्वरुपात भरलेली आहेत.

(३) हे अंशतः खरे आहे. पालघर येथील २०० खाटांचे रुग्णालयाचे बांधकाम निविदास्तरावर आहे. निविदा अंतिम झाल्यानंतर सदरच्या बांधकामाचे कार्यारंभ आदेश देऊन ही कामे २ वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील.
(४) ग्रामविकास विभागाच्या दि.१० मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित पाच संवर्गातील पदभरती जि.प. स्तरावर जिल्हा निवड मंडळातर्फे करण्याबाबत व त्यानुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हा परिषदेकडे नोंदणी असलेली अतिक्रमणे नियमाकुल करणेबाबत**

**(९) ३७९५५ (०७-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हा परिषदेकडे नोंदणी असलेली तब्बल ७ हजार २०७ अतिक्रमणधारक रहिवासी अतिक्रमणे नियमाकुल करण्याच्या प्रतीक्षेत असून गेल्या वर्षभरापासून अतिक्रमणे नियमाकुल करण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक २०.०२.२०१८ च्या शासन निर्णयानुसार धुळे जिल्ह्यामध्ये १३७३५ इतक्या अतिक्रमणधारकांची नोंद संगणकिय प्रणालीमध्ये करण्यात आली. यापैकी १३२५२ गावठाण क्षेत्रातील व ४८३ अतिक्रमणे महसुल व इतर विभागाच्या जागेवरील आहेत.
गावठाण क्षेत्रातील १३२५२ पैकी ६०४५ अतिक्रमणे नियमानुकुल करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. उर्वरित अतिक्रमणे नियमानुकुल करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सर जे.जे. रुग्णालयातील सहयोगी प्राध्यापक यांनी नियमबाह्यरित्या बदलीचे आदेश रद्द केल्याबाबत**

**(१०) ३८४२४ (१३-०४-२०२२) श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भायखळा येथील सर जे.जे. रुग्णालयातील मुख्य शल्य चिकित्सक ,शास्त्र विभागात गेल्या अनेक वर्षापासून सहयोगी प्राध्यापक या एकाच पदावर काम कार्यरत असणारे डॉ.मोहम्मद आयुब सिद्दिकी यांची शासनाने खाजगी रुग्णालयात प्रॅक्टीस केल्याप्रकरणी दोषी ठरवून शासन आदेश क्र.२०१८/प्र.क्र.१२२/१८ वै.सेवा-२ अन्वये नागपूर येथील शासकीय महाविद्यालयात बदलीबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले असतानाही त्यांनी नियमबाह्यरित्या बदली आदेश रद्द केला असल्याची बाब दिनांक १० जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, त्यानुसार उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (३१-०१-२०२३) :**(१) डॉ.मोहम्मद अयुब सिध्दीकी, सहयोगी प्राध्यापक, मुत्रशल्यचिकित्साशास्त्र यांची शासन आदेश दि.२०.०६.२०१८ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे करण्यात आलेली बदली सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने शासन आदेश दि.०३.२०२१ अन्वये रद्द करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) डॉ.मोहम्मद अयुब सिध्दीकी यांच्याविरुध्द खाजगी व्यवसाय करित असल्याबाबत शासन ज्ञापन दि.०८.११.२०१७ अन्वये दोषारोप बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

---

## उस्मानाबाद येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील रिक्त पदांची भरती व जादा खटांना लागणारी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) ३९१७९ (२४-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद येथील सद्यःस्थिती असलेले जिल्हा स्त्री रुग्णालय हे केवळ ६० खाटांचे असून तेथे येणा-या स्त्री रुग्णांची संख्या पहाता ब-याच वेळा प्रसूती झालेल्या स्त्रीयांना खाट उपलब्ध होत नसल्यामुळे परिणामी जमिनीवर झोपावे लागत असल्यामुळे स्त्री रुग्ण व त्याच्या बाळांची गैरसोय व योग्य उपचार मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयातील रिक्त पदांची भरती व १०० खटांसाठी लागणारी शासकीय जमिन त्वरीत उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन जिल्हयाच्या पालकमंत्र्यांनी दिल्याची बाब दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जिल्हयात स्त्री रुग्णासलयांचे २०० खाटांच्या रुग्णायलयामध्ये रुपांतर करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व नागरीकाकडून वारंवार केली जात होती, हे हीखरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा रुगणालयातील सेवकांची ५४ पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित असल्यामुळे रुग्णालयाच्या दैनंदिन कामात गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२२ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या रुग्णालयांच्या खाटांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने त्यास लागणारी शासकीय जमिन त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच पदभरती बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा स्त्री रुग्णालय, उस्मानाबाद हे ६० खाटांचे असून तेथे येणाऱ्या स्त्री रुग्णांची संख्या विचारात घेता काही वेळेस प्रसुती झालेल्या स्त्रियांना खाटा उपलब्ध नसल्याने फ्लोअर बेड देण्यात येतो. मात्र त्यामुळे स्त्री रुग्ण व बाळाची गैरसोय व योग्य उपचार मिळत नाहीत हे खरे नाही.

(२) शासनस्तरावर प्रस्ताव अप्राप्त आहे.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

(५) जिल्हास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्हयात कोराना सेटर तसेच आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) ३९९९९ (२४-०४-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना व ओमायक्रोनच्या रुग्णांत वाढ होत असून सातारा जिल्हयात कोरोनाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोरोनाची ही तिसरी लाट असल्याचे जाहिर केले असून या लाटेतील धोका टाळण्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक कोरोना सेंटर सुरु करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी सातारा जिल्हयाला निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी तसेंच आरोग्य विभागातील रिक्त असलेली पदे त्वरित भरण्यांत यावी अशी मागणी जिल्हा आरोग्य अधिकारी संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२७-०२-२०२३) :** (१) सातारा जिल्ह्यात कोरोना व ओमायक्रोनच्या रुग्णात वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये निदर्शनास आले. तथापि, सद्यस्थितीमध्ये रुग्ण संख्येमध्ये घट झाली असून ओमायक्रोनचे नवीन रुग्ण आढळून आले नाही.
(२) तिसऱ्या लाटेमध्ये संभाव्य रुग्ण वाढीचा धोका पाहता सातारा जिल्ह्यामध्ये पाटण तालुक्यामध्ये दोन व उर्वरित १० तालुक्यात प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण १२ कोरोना केअर सेंटरचे नियोजन करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडा विभागातील सर्वच जिल्हयात कमी वयात आई/ गर्भवती होण्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याबाबत**

**(१३) ४०२४१ (२४-०४-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागातील सर्वच जिल्हयात १८ वर्षापूर्वी मुलीच्या लग्नाचे व कमी वयात आई/ गर्भवती होण्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे पाचव्या राष्ट्रीय आरोग्य व कुटुंब यांनी दि.१९ जून ते ३० डिसेंबर, २०२० या कालावधीत केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे प्रकार कमी होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०२-२०२३) :** (१) होय.
पाचव्या राष्ट्रीय आरोग्य व कुटुंब सर्वेक्षणानुसार राज्यात १८ वर्षापूर्वी मुलींच्या लग्नाचे प्रमाण २१.९ टक्के असून कमी वयात आई/ गर्भवती होण्याचे प्रमाण ७.६ टक्के आहे. त्या तुलनेत मराठवाडा विभागामधील ८ जिल्ह्यांचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | जिल्हा | १८ वर्षापूर्वी मुलींच्या लग्नाचे प्रमाण | कमी वयात आई/गर्भवती होण्याचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ३५.८ | १२.४ |
| २ | जालना | ३५ | १०.१ |
| ३ | हिंगोली | ३७.१ | १४.४ |
| ४ | परभणी | ४८ | १३.७ |
| ५ | बीड | ४३.७ | १५.२ |
| ६ | लातूर | ३१ | १४.२ |
| ७ | उस्मानाबाद | ३६.६ | १६.१ |
| ८ | नांदेड | ३२.२ | ८.७ |

(२) राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १० ते १९ वर्ष वयोगटातील किशोर वयीन मुलामुलींना समुपदेशकांमार्फत विवाहपूर्व समुपदेशन, गर्भनिरोधक आणि गर्भपात याबाबत समुपदेशन करण्यात येते तसेच मुलींचा विवाह १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतरच करण्याबाबत जनजागृती व प्रसिध्दी करण्यात येते. लसीकरण सत्रामध्ये किशोरवयीन मुलींना विवाहाचे वय व गर्भधारणेसाठी योग्य वय याबाबत आरोग्य शिक्षण देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्गातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाच्या मान्यतेसाठी इंडियन सीपीआर महाविद्यालयातील नियमित डॉक्टरांना सिंधुदूर्गात पाठविण्यात आल्याबाबत**

**(१४) ४१७१५ (२४-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग मधील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाच्या मान्यतेसाठी इंडियन मेडिकल कौन्सिलकडून पर्यवेक्षण करण्याकरिता सीपीआर महाविद्यालयातील नियमित ४० डॉक्टरांना तीन महिन्यांपूर्वी सिंधुदूर्गात पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सीपीआर रुग्णालयातील (जि.कोल्हापूर) रुग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया महिनाभर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले,हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, यामुळे सीपीआर रुग्णालयातील रुग्णसेवा बजावित असलेल्या उर्वरीत कर्मचा-यावर अतिरीक्त ताण येत आहे ,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश महाजन (२२-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रतिनियुक्तीच्या कालावधीत अत्यावश्यक व तातडीच्या शस्त्रक्रिया कार्यरत डॉक्टरांमार्फत पार पाडण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

प्रतिनियुक्तीने कार्यरत सर्व अध्यापक मुळ संस्थेत रुजू झाले आहेत.

---

**मुक्ताईनगर विधानसभा मतदार संघातील अतिक्रमण धारकांना योजनेचा लाभ मिळणेबाबत**

**(१५) ४२५२९ (०७-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ पूर्वीच्या १५०० चौ.फूट च्या आतील अतिक्रमण धारकांच्या जागा नियमाकूल करणे संदर्भात सन २०१८ मध्ये शहरी व ग्रामीण भागासाठी शासन निर्णय काढण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुक्ताईनगर विधानसभा मतदार संघातील मुक्ताईनगर, बोदवड व रावेर तालुक्यातील असंख्य अतिक्रमण धारक आजही या शासन निर्णयापासून वंचित आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरील योजनेचा लाभ मुक्ताईनगर विधानसभा मतदार संघातील अतिक्रमण धारकांना मिळणेकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

**श्री. गिरीश महाजन (२०-०२-२०२३) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | नोंदणी झालेले लाभार्थी संख्या | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिलेले लाभार्थी संख्या | | | अतिक्रमण नियमानुकुल झालेले लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | फि सह | फि विना | एकूण | |
| १ | मुक्ताईनगर | ३०१३ | ७१५ | ३०७ | १०२२ | ५६ |
| २ | बोदवड | ३४७ | १२ | ० | १२ | ० |
| ३ | रावेर | २२३६ | २० | ३० | ५० | २ |
| | एकूण | ५५९६ | ७४७ | ३३७ | १०८४ | ५८ |

वरील प्रमाणे एकुण १०८४ लाभार्थ्यांचे अतिक्रमण निवासी प्रयोजनार्थ नियमानुकूल करण्यात आले आहे. उर्वरित लाभार्थ्यांचे अतिक्रमण नियमानुकूल करणेचे कामकाज प्रगतीत आहे. अतिक्रमण नियमानुकूल प्रमाणपत्र दिलेल्या लाभार्थी संख्या ५८ आहे.

---

## सांगली सिव्हीलमध्ये डॉक्टर्स आणि कर्मचारी वर्ग तसेच सुविधांची कमतरता असल्याबाबत

**(१६) ४३५१९ (२४-०४-२०२२) श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील मिरज सिव्हील रुग्णालयाचे रुपांतर पुन्हा कोविड हॉस्पिटलमध्ये केल्यामुळे नॉन कोविड रुग्णांची विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी सांगलीच्या सिव्हिलमध्ये जावे लागत असल्याचे माहे जानेवारी ,२०२२ मध्ये वा त्यादरम्यारन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सांगली सिव्हीलमध्ये डॉक्टर्स आणि कर्मचारी वर्गाची कमतरता असल्याने उपलब्ध डॉक्टरांवर अतिरिक्त ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयाम जिल्हयासह कोल्हापूर, सातारा आणि कर्नाटक राज्यातून दररोज शेकडोच संख्येने रुग्ण उपचारासाठी येत असतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२१-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०१ जानेवारी, २०२२ पासून कोविडच्या तिस-या लाटेचे रुग्ण असल्यामुळे नॉन कोविड रुग्णसेवा तात्पुरती बंद केली गेली होती , जे ३१ मार्च २०२२ पासून टप्प्याटप्प्याने परत सुरु करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई(जि. बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील स्वीय प्रपंची (PLA) खात्यातील रक्कमेच्या भ्रष्टाचारा बाबत

**(१७) ४४०९५ (२४-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई(जि. बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील स्वीय प्रपंची (PLA) खात्यातील रक्कम आपत्कालीन परिस्थितीत/अत्यंत तातडीच्या वेळी खर्च करणे आवश्यक असुन सदर रक्कम खर्च करतांना संचालक यांची परवानगी घेणे आवश्यक आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड काळात (सन २०२०-२१) तत्कालिन अधिष्ठाता श्री. शिवाजी सुक्रे यांनी संचालक यांची परवानगी न घेता रुग्णालय व महाविद्यालयाच्या स्वीय प्रपंची (PLA) खात्यातून रुग्णालय व महाविद्यालयात बोर्ड/पोस्टर्स/लाईट फोकसचे काम, बांधकामाचे देयक अशी लाखो रुपयांची अनावश्यक देयके अदा करून गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर देयके अदा करतांना टिपणी मध्ये महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक ०४ मार्च, २०२० च्या शासन निर्णयान्वये नमूद बाबीच्या प्रयोजनासाठी स्वीय प्रपंची (PLA) खात्यातून खर्च करता येत नसल्यामुळे खर्च करणे उचित होणार नाही अशी टिपणी लिहली असतानाही तत्कालीन अधिष्ठाता यांनी सदर देयके अदा केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन अधिष्ठाता श्री. शिवाजी सुक्रे यांच्याकडे त्या वेळी नंदुरबार रुग्णालयाचा ही चार्ज होता त्याठिकाणीही अशीच स्वीय प्रपंची (PLA) खात्यातून अनधिकृत देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोविड काळात सर्वसामान्य जनता आरोग्य सुविधेसाठी त्रस्त असतांना अधिष्ठाता श्री, शिवाजी सुक्रे यांनी स्वीय प्रपंची (PLA) खात्यातील रक्कम आपत्कालीन परिस्थितीत खर्च करणे आवश्यक असतानाही सदर रक्कम इतरत्र खर्च करत गैरव्यवहार केला असल्याने सदर प्रकरणी तातडीने चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक १५ जून २०२१, ११ सप्टेबर, २०२१ व १५ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास,या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची करणे काय आहे?

**श्री. गिरीश महाजन (०९-०३-२०२३) :** (१), (२) व (३) शासनाच्या दिनांक ४ मार्च २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये वैद्यकीय शिक्षण व संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थामधील स्वीय प्रपंज खात्यातील निधी संस्थास्तरावर खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार तत्कालीन अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांनी संस्थास्तरावरील देयके अदा केली आहेत.

(४) नाही. नंदूरबार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकरिता अद्याप स्वीय प्रपंची (PLA) खाते उघडण्यात आलेले नाही.

(५) व (६) होय. सदर तक्रारींचा अनुषंगाने संचालनालयास्तरावर चौकशी सुरु आहे.

---

**महात्मा गांधी स्मारक रूग्णालय, परळ, मुंबई येथील कार्मचारी व अधिकारी**
**यांना निवास्थानाची व्यवस्था करण्याबाबत**

**(१८) ४४६७६ (११-१०-२०२२) श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी स्मारक रूग्णालय,परळ,मुंबई येथिल कार्मचारी व अधिकारी यांना सेवा निवास्थान रिक्त करण्यासंदर्भात वर्तमान पत्रातून जाहिर सुचना देण्यात आली असल्याचे दिनांक २८ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हया सर्व इमारती कोणत्या साली बांधण्यात आल्या आहेत तसेच हया इमारती धोकादायक होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या इमारती वेळीच दुरूस्त केल्या असत्या तर त्या धोकादायक असल्याचे जाहीर करावे लागले नसते , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हया इमारती मध्ये राहणाऱ्या कर्मचारी व आधिकारी यांची निवासाची कोणती पर्याय व्यवस्था शासनाने केली आहे काय ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०२-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, परळ, मुंबई येथील इमारत क्र.१,२,३-डी, ३-जुनी व ४ या निवासी इमारती हया सन १९६८ साली बांधण्यात आल्या आहेत. तसेच इमारत क्र.५ सन १९७५ साली व नर्सेस होस्टेल आणि डीन ऑफीस इमारत सन १९६२ साली बांधण्यात आली आहे. त्यापैकी इमारत क्र.५ वगळता अन्य इमारती बांधून सुमारे ५४ वर्षे तसेच इमारत क्र.५ ही ४७ वर्षे जुनी होऊन सर्व इमारती जीर्ण झाल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

सदर इमारतींची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आली असून सदर इमारती जुन्या होऊन जीर्ण झाल्यामुळे धोकादायक झाल्या आहेत.

(४) सदर रुग्णालयाच्या निवासी इमारतींमधील वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, ठाणे, वाशी व कांदिवली येथे पर्यायी निवास व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच रुग्णालयातील अधिकारी वर्गासाठी नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातातील कर्मचाऱ्याचे मानधन मिळणेबाबत**

**(१९) ४४८७२ (११-१०-२०२२) श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात काम करणारे कंत्राटी डॉक्टर व कर्मचारी यांना मानधन वेळेवर मिळत नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, डॉक्टर, नर्स, परिचारिका व आरोग्य कर्मचारी यांना वेळेवर मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२३-०२-२०२२) :**(१) व (२) हे खरे आहे .

केंद्र शासनामार्फत प्राप्त सुचनांनुसार SNA (Singal Nodal Account) प्रणाली सुरु करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. सदर प्रणालीची अंमलबजावणी करण्याकरीता राज्यातील सर्व संस्थास्तरावरील बँक खाते हे राज्यस्तरावरील SNA शी संलग्न करण्याची व संबंधितांना प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया करण्यात आली. या कालावधीत केंद्र शासनाकडून, निधी वितरीत करण्यात आला नाही. ज्या वेळेस SNA ची अंमलबजावणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर जिल्ह्यांना तात्काळ निधी वितरीत करुन वेतन अदा करण्यात आलेले आहे.

माहे एप्रिल व मे २०२२ चे मानधन संबंधित कर्मचाऱ्यांना दि.१४.०६.२०२२ रोजी अदा करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजनांच्या**

**(२०) ४५१४३ (०९-१०-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "कुपोषण मुक्त महाराष्ट्र" ही मोहिम राज्यात राबविली जात असतानाही ८१ हजार ९०४ तीव्र कुपोषित बालके याशिवाय तब्बल पाच लाख मुले कुपोषणाच्या (श्रेणी-मध्यम) मार्गावर असल्याचे माहे मे,२०२२ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्हयात १२२ तीव्र कुपोषित,१५३१ मध्यम कुपोषित बालके,हिंगोली जिल्हयात ७२१ बालके तीव्र कुपोषित बालके ,नागपूर जिल्हयात १३५९ मध्यम तीव्र व अतितीव्र कुपोषित बालके तर हिंगणा तालुक्यात १९९ कुपोषित बालके असून तीव्र कुपोषित (मॅम) १०५१ व अतितीव्र कुपोशित (सॅम) २०८ बालके विविध आजारानेत्रस्त तसेच गोंदिया जिल्हयामध्ये ३०० पेक्षा जास्त अतितीव्र तथा २३०० कुपोषीत बालके असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्ह्यातील मध्यम कुपोषित आणि अतितीव्र कुपोषित श्रेणीतील बालकांना कुपोषित मुक्त करण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेने माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान "कुपोषित बालके दत्तक" योजना राबविण्यास सुरुवात केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनामार्फत कुपोषित बालकांना पोषण आहार शासनातर्फे देण्यात येतो तथापि सदर पोषण आहार कुपोषित बालकांपर्यंत पोहोचत नसल्याचे देखिल निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण कमी करण्यासाठी मध्यम कुपोषित हजारो बालकांनी पुढचा टप्पा गाठू नये व तीव्र कुपोषित बालकाची संख्या कमी करणे तसेच "कुपोषित बालके दत्तक" योजनेची अंमलबजावणी प्रभाविपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१७-०१-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
मागील तीन वर्षाच्या मासिक प्रगती अहवालानुसार राज्यातील पोषणस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | एकूण वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण बालके | % | मध्यम कुपोषित | % | तीव्र कुपोषित बालके | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मे, २०२२ | ६१७८९११ | ५६३८०६५ | ९१.२ | ४५७२४६ | ७.४ | ८३६०० | १.३ |
| मे, २०२१ | ६०९२५७० | ५४९४७९७ | ९०.२ | ५१४४४६ | ८.४ | ८३३०९ | १.४ |
| मे, २०२० | ५८५२२१९ | ५११०५६९ | ८७ | ६१७४६५ | १०.५ | १२४१८५ | २.१ |

वरील विवरणपत्रानुसार असे निदर्शनास येते की, कुपोषणाचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे कुपोषणमुक्त महाराष्ट्राची मोहिम योग्य प्रकारे राबविली जात आहे.
(२) अंशत: खरे आहे.
स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त मार्च, २०२२ पासून आरोग्य विभागाच्या मदतीने अंगणवाडीतील लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी (SCREENING) मोहिम राबविण्यात आली होती. सदर तपासणीमध्ये आढळून आलेल्या SAM बालकांना ग्राम बाल विकास केंद्रामध्ये दाखल करण्यात आले. सदर बालकांना Energy Dense Nutritious Food व पुरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यात आला. त्यामुळे ग्राम बाल विकास केंद्रात दाखल करण्यात आलेल्या एकूण बालकांच्या ६४.८% बालकांचें श्रेणीवर्धन झालेले आहे. सॅम बालकांची जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| | VCDC केंद्रात दाखल करण्यात आलेली एकूण सॅम बालके | सॅममधून सर्वसाधारण श्रेणीमध्ये आलेली बालकांची एकूण संख्या | सॅममधून सर्वसाधारण श्रेणीमध्ये आलेल्या बालकांची टक्केवारी | सॅममधून मॅम श्रेणीमध्ये आलेली बालकांची एकूण संख्या | सॅममधून मॅम श्रेणीमध्ये आलेल्या बालकांची टक्केवारी | सॅममधून श्रेणीवर्धन झालेल्या बालकांची एकूण संख्या | सॅममधून श्रेणीवर्धन झालेल्या बालकांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | १२२ | ११ | ९.०२ | २४ | १९.६७ | ३५ | २८.६९ |
| हिंगोली | ९८ | ६५ | ६६.३३ | २५ | २५.५१ | ९० | ९१.८४ |
| नागपूर | १६३ | ३६ | २२.०९ | ७५ | ४६.०१ | १११ | ६८.१० |
| गोंदिया | २११ | ३५ | १६.५९ | १०८ | ५१.१८ | १४३ | ६७.७७ |

(३) हे खरे आहे.
पुणे जिल्ह्यात मध्यम कुपोषित (MAM) व तीव्र कुपोषित (SAM) बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी जिल्हापरिषदेमार्फत दिनांक २६ जानेवारी,२०२२ रोजी सर्व ग्रामपंचायती स्वयंसेवी संस्था, स्थानिक पदाधिकारी, दानशुर व्यक्ती, सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सॅम व मॅम बालके दत्तक घेण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.
(४) हे खरे नाही.
एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कुपोषित मुलांना सर्वसाधारण बालकांच्या तुलनेत अतिरिक्त पोषण आहार

दिला जातो. तीव्र कुपोषित बालकांना ग्राम बाल विकास केंद्रामध्ये दाखल करुन Energy Dense Nutritious Food (EDNF) चा पुरवठा करण्यात येतो.

(५) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

१. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता यांना THR व ३ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२. तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु असून सदर योजनेंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी व केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३. तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४. राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधिारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

सदर उपाययोजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचतात की नाही याबाबत जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी व मुख्यसेविका यांचे कडून पाहणी करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बालसंगोपन योजनेअंतर्गत देण्यात येण्याऱ्या अनुदानासंदर्भात**

**(२१) ४५३३५ (०९-१०-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३८,२४० बालकांना "बालसंगोपन योजने" चा लाभ द्यावयाचा असल्याचे आयुक्त, महिला व बालविकास विभाग यांनी पत्राद्वारे शासनास दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास कळविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत सुमारे ३८,२४० बालकांसाठी देण्यात येणाऱ्या सहाय्यक अनुदानात शासनाने या अर्थसंकल्पात २५०० रुपये इतकी वाढ जाहीर केली तथापि या बालकांची देखरेख करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना केवळ सव्वाशे रुपये अदा करण्यात आल्याने त्यांच्यात नाराजीची भावना निर्माण झाली असल्याचे दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०९-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) तत्कालिन मा.मंत्री (वित्त) यांनी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी झालेल्या भाषणामध्ये बालसंगोपन योजनेच्या सहायक अनुदानामध्ये रुपये २५००/- इतकी वाढ करणे बाबतची घोषणा विधीमंडळामध्ये केलेली आहे. त्यानुषंगाने बालसंगोपन योजनेंतर्गत प्रतिलाभार्थी रुपये १,१००/- वरुन रुपये २,२५०/- आणि बालकांची देखरेख करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेला रुपये १२५/- वरुन रुपये २५०/- इतकी अनुदान वाढ करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील उपजिल्हा रुग्णालय, कळवणी, उपजिल्हा रुग्णालय, दापोली व ग्रामीण रुग्णालय, मंडणगड येथील पदे रिक्त भरण्याबाबत**

**(२२) ४५५२६ (११-१०-२०२२) श्री. योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील उपजिल्हा रुग्णालय, कळवणी, उपजिल्हा रुग्णालय, दापोली व ग्रामीण रुग्णालय, मंडणगड येथे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड -१९ सारख्या संकटकाळी मोठया प्रमाणात पदे रिक्त ठेवण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-१-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२०) ची रिक्त पदे भरणेबाबत सन २०२१ मध्ये जाहीरात प्रसिद्ध करण्यात येऊन भरतीप्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

तसेच वैद्यकीय अधिकारी, गट-अ (एस-२०) ची पदे रिक्त राहू नयेत याकरीता तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची पदे जिल्हास्तरावरून भरण्यात येतात. व बंधपत्रित उमेदवारांना त्यांचा बंधपत्र पुर्ण करण्याकरीता सदर ठिकाणी नियुक्ती देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला आरोग्य मंडळाचे आरोग्य उपसंचालक यांनी केलेल्या गैरकारभाराबाबत**

**(२३) ४५६८३ (११-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला आरोग्य मंडळाचे आरोग्य उपसंचालक डॉ.राजकुमार चव्हाण हे अकोल्यात जिल्हा शल्य चिकित्सक या पदावर असतांना त्यांनी गैरकारभार केल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (३०-०१-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे. डॉ. राजकुमार चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला यांच्याकडे उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला या पदाचा अतिरिक्त कार्यभार असतांना त्यांच्याविरुध्द माहे मे, २०२२ मध्ये तक्रारी प्राप्त झालेल्या नसून त्या तत्पूर्वी, सन २०२०-२०२१ मधील आहेत.

(२) सन २०२०-२०२१ मधील प्राप्त तक्रारीनुसार चौकशी करण्यात आली असून चौकशी समितीचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेण्यात येत आहेत.

(३) व (४) अंतिम अहवालानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

**मौ. भादा व मौ. उजणी (ता.औसा,जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र दर्जोन्त करून ग्रामीण रुग्णालयाची मान्यता देणेबाबत**

**(२४) ४५९०६ (११-१०-२०२२).श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. उजणी (ता.औसा,जि.लातूर) हे गाव लातूर व उस्मानाबाद सीमेवरील ५००० पेक्षा जास्तीची लोकसंख्या

असलेले व अनेक लहान गावांची मोठी बाजारपेठ असलेले असून परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या सोयीसाठी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र दर्जोन्नत करून ग्रामीण रुग्णालाय करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. पालकमंत्री, लातूर यांच्याकडे दिनांक २७ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास लातूर जिल्हा नियोजन समीतीच्या आढावा बैठकीत मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,मौ. भादा व मौ. उजणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण रुग्णालय म्हणून दर्जोन्नत करण्यासाठी दोन्हीचे एकत्रित प्रस्ताव त्वरित शासनास सादर करण्याचे निर्देश मा. पालकमंत्री, लातूर यांनी आरोग्य प्रशासनास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहेत काय,

(४) असल्यास, सदरील प्रस्ताव मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०२-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) भादा प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण रुग्णालय म्हणून दर्जोन्नत करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेला होता. तथापि, सदर प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्याने त्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर यांच्याकडून त्रुटी पूर्ततेबाबत माहिती मागविण्यात आली आहे.

तसेच उजणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण रुग्णालय म्हणून दर्जोन्नत करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयास अप्राप्त आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ. रामलिंग मुदगड (ता. निलंगा जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मान्य पदे भरती प्रलंबित असल्याबाबत

**(२५) ४५९०८ (११-१०-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. रामलिंग मुदगड (ता. निलंगा जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे काम पूर्ण झाले असून वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची मान्य पदे भरती करण्याबाबत व प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास लातूर जिल्हा नियोजन समीतीच्या आढावा बैठकीत मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने मान्य पदांची भरती करणे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रास आवश्यक वैद्यकीय साहित्य पुरवठा करून केंद्र सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्राथमिक आरोग्य केंद्र दि. १०.१०.२०२१ रोजी कार्यान्वित करण्यात आले असून आकृतीबंधानुसार १५ मंजूर पदांपैकी ०४ पदे भरलेली असून ०१ पद बदलीमुळे दि. ०१.०६.२०२२ पासून रिक्त आहे. उर्वरित १० कुशल/अकुशल पदांपैकी ०९ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात आली होती. त्यापैकी सद्यस्थितीत ०२ पदे कार्यरत असून उर्वरित ०७ पदांना दि. ०१.०६.२०२२ पासून तांत्रिक खंड देण्यात आला आहे. वेतनाकरीता तरतुद उपलब्ध होताच संबंधित कर्मचाऱ्यांना रूजू करून घेण्यात येईल.

तसेच आवश्यक औषधी व वैद्यकीय साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

### वेवजी (ता. तलासरी, जि.पालघर) या ग्रामपंचायतीच्या हद्दीत गुजरात राज्यातील सोलसुंबा ग्रामपंचायतीने अतिक्रमण केल्याबाबत

**(२६) ४६२१९ (०९-१०-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व गुजरात सीमा वाद पालघर जिल्ह्याच्या उत्तरेला सीमा भागातील तलासरी या आदिवासी बहुल तालुक्यातील वेवजी ग्रामपंचायतीच्या हद्दीत गुजरातच्या सोलसुंबा ग्रामपंचायतीने अतिक्रमण केल्याची गंभीर बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर भूमी अभिलेख कार्यालयाकडून दिनांक ०३ मार्च व ०४ मार्च २०२२ रोजी वा त्यासुमारास विविध शासकीय विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत मोजणी करण्यात आली असता निमंत्रण देऊन देखील गुजरात प्रशासनाकडून कोणीही उपस्थित नव्हते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. गिरीश महाजन (१६-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) भूमि अभिलेख तलासरी यांचेर्माफत दि.०३/०३/२०२२ व दि.०४/०३/२०२२ रोजी मोजणी निश्चित करण्यात आली असता या मोजणीदरम्यान ग्रामपंचायत वेवजी येथील कर्मचारी उपस्थित होते. परंतू ग्रामपंचायतीर्माफत जिल्हाधिकारी , पालघर यांनी पत्रव्यवहार करूनदेखील गुजरात राज्यातील सोलसुंबा ग्रामपंचायतीचे कोणीही कर्मचारी मोजणीस उपस्थित राहिले नाहीत. भूमि अभिलेख तलासरी यांचेर्माफत दिनांक २६/०५/२०२२ रोजी हद्द निश्चितीसाठी मोजणीबाबत पत्रव्यवहार करण्यात आला असता, राज्याची महसूल यंत्रणा, पोलिस यंत्रणा, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, तलासरी व स्थानिक ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी उपस्थित होते. परंतू गुजरात राज्याकडून जोपर्यंत सूचना येत नाहीत, तोपर्यंत मोजणी करून देण्यास गुजरात राज्यातील सोलसुंबा ग्रामपंचायतीच्या वतीने हरकत घेण्यात आली असल्याने हद्द निश्चिती करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नेकनूर (ता.जि. बीड) येथील स्त्री व कुटीर रुग्णालयातील जन्म-मृत्यू नोंदणीबाबत Crs -Software चा login I.D बंद असल्याबाबत

**(२७) ४६३९० (११-१०-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेकनूर (ता.जि. बीड) येथील स्त्री व कुटीर रुग्णालयातील जन्म- मृत्यु नोंदणी Crs - Software चा login I.D No. MH ३४५०६ SR हा दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते दि. २८ जानेवारी,२०२० या कालावधीत बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साईड बंद असल्यामुळे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र देणे बंद असल्याने परिसरातील नागरिकांना अंगणवाडीतील नोंद व शाळेतील प्रवेश मिळण्यासाठी अडचण येत असल्याने त्यांची गैरसोय होत असल्यामुळे या रुग्णालयातील जन्म- मृत्यू नोंदणी Crs - Software चा login I.D No MH ३४५०६ SR हा तातडीने सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक ०४ जून,२०२२ रोजी वा त्यासुमारस केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०२-२०२३) :** (१)  हे खरे नाही.

(२) नेकनूर (ता.जि.बीड) येथील स्त्री व कुटीर रूग्णालयातील MH३४५०६SR या यूजर आयडी वरून दिनांक ०१.०१.२०१६ ते २८.०१.२०२० या कालावधीत जन्म नोंदणी झालेली आहे. सदर यूजर आयडी दिनांक ३०.०३.२०२२ रोजी पासून Inactive झाल्याने त्यावरील तत्कालीन नोंदी वरून संबंधितांना जन्म प्रमाणपत्र वितरित करता येत नव्हते. सदर यूजर आयडी दिनांक १५.०६.२०२२ पासून सुरू करण्यात आलेला असून या यूजर आयडी वरून नोंदणी झालेली प्रमाणपत्रे देण्यात येत आहेत. तथापि सदर केंद्राकरिता दिनांक २९.०१.२०२० पासून MH४४००२RE हा नविन यूजर आयडी देण्यात आलेला आहे. या यूजर आयडी वरून जन्म मृत्यू नोंदणी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४)  प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव खंडेश्वर( जि.अमरावती) येथील ग्रामीण रुग्णालय येथे रक्त संकलन केंद्र मंजूर करण्याबाबत

**(२८)  ४६५४२ (११-१०-२०२२).   श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :**  सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर( जि.अमरावती) येथील ग्रामीण रुग्णालय येथे रक्त संकलन केंद्र मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी  यांनी दि.२९ जानेवारी ,२०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.आरोग्य मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार या ग्रामीण रुग्णालयात रक्त संकलन केंद्र मंजूर करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०२२-२३ च्या पीआयपी मध्ये नवीन रक्त संकलन केंद्रास आवश्यक असणाऱ्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी केंद्र शासनामार्फत निधी मंजुर करण्यात आला आहे. त्यामधून नांदगाव खंडेश्वर( जि.अमरावती) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या रक्त संकलन केंद्रास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(३)  प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामान्य रुग्णालय, खामगाव (जि. बुलढाणा) येथील रुग्णकल्याण समितीवर अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्याबाबत

**(२९)  ४६६३७ (११-१०-२०२२).   ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :**  सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामान्य रुग्णालय ,खामगाव (जि.बुलढाणा) येथील रुणकल्याण समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे आदेशाने केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा मंत्री अन्न व औषध प्रशासन व पालकमंत्री बुलढाणा जिल्हा यांनी सदर दोन  नियुक्त्या करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी बुलढाणा याना पत्राद्वारे कळविले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,शासन निर्णयानुसार रुग्णकल्याण समितीमध्ये आमदार प्रीतिनिधी नेमणुकीचा अधिकार स्थानिक लोकप्रतिनिधी याना असतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,असे असताना आमदारांचा हक्क डावलून जिल्हाधिकारी ,बुलढाणा तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांनी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करून केलेल्या नियुक्त्या रद्द करण्यात येणार आहेत  काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०२-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) दिनांक १४.०९.२०१२ रोजीच्या शासन निर्णयानूसार रुग्ण कल्याण समितीच्या अशासकीय सदस्यांची नियुक्ती मा.पालकमंत्री यांच्या सहमतीने व जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात यावे असे आदेशित केले आहे.त्यामुळे सदर अशासकीय सदस्यांची नियुक्ती मा.पालकमंत्री,जि.बुलढाणा यांच्या सहमतीने व जिल्हाधिकारी,बुलढाणा यांच्या स्वाक्षरीने सदर नियुक्ती करण्यात आली आहे.यामध्ये अधिकाराचा गैरवापर झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि. बुलढाणा) येथील राष्ट्रीय आरोग्य अभियान पीआयपी या योजने अंतर्गत कामे मंजूर करण्याबाबत**

**(३०) ४६६४७ (११-१०-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथील राष्ट्रीय आरोग्य अभियान पीआयपी सन २०२२-२०२३ या योजनेअंतर्गत कामे मंजूर करण्याबाबत मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीआयपी सन २०२२-२३ या योजनेअंतर्गत खामगाव मतदार संघातील सहा कामांना मंजुरात देण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) केंद्रशासनाला मंजुरीसाठी पाठविलेल्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडयामध्ये प्रस्तावित ६ कामांचा समावेश करण्यात आला होता. तथापि सदर कामांना केंद्र
शासनाने मंजुरी दिली नाही.

---

**यवतमाळ पंचायत समितीने तालुक्यातील ८० गावांमध्ये ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात आलेल्या नर्सरी योजनेतील एकही झाड जिवंत नसल्याबाबत**

**(३१) ४६८१४ (०९-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ पंचायत समितीने तालुक्यातील ८० गावांमध्ये ग्रामपंचायत अंतर्गत तब्बल साडेतेरा कोटी रुपयांची राबविण्यात आलेल्या नर्सरी योजनेतील एकही झाड पुराव्यादाखल जिवंत नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने कोणत्या कलमान्वये तक्रार दाखल करण्यात आली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही .

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपूर येथे औषधांचा व इतर अत्याधुनिक साहित्याचा तुटवडा असल्याबाबत

**(३२) ४७००४ (११-१०-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे औषधांचा तसेच इतर अत्याधुनिक साहित्याचा तुटवडा असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषधांचा तुटवडयामुळे रुग्णांची गैरसोय होत असून अनेक रुग्णांना रक्त किंवा विविध चाचण्यांसाठी रुग्णालयाला लागून असलेल्या चांदेकर यांच्या पॅथॉलॉजी लॅब मध्ये पाठविले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार खाजगी लॅबमध्ये रुग्णांना विविध चाचणी साठी पाठविण्या-या संबधितावर कारवाई करणेसह रुग्णांना वेळीच औषधोपचार व अत्याधुनिक साहित्यांचा तसेच औषधांचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२१-०२-२०२३) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंतप्रधान आवास योजनेच्या बदलेल्या निकषानंतर ऑनलाईन याद्यांमध्ये संगणकीकृत अदलाबदलीमुळे अनेक लाभार्थ्यांना त्रास झाल्याबाबत

**(३३) ४७१९१ (०७-१०-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेच्या बदलेल्या निकषानंतर ऑनलाईन याद्यांमध्ये प्रशासकीय स्तरावरुन झालेल्या संगणकीकृत अदलाबदलीचा त्रास अनेक लाभार्थ्यांना झाल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जैतापूर येथील ८० वर्षीय उज्वला शंकर गीरकर या निराधार वृध्देसह अनेक लाभार्थ्यांना हक्काच्या घरापासून वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त याद्यांमध्ये अपलोड करतांना अदलाबदली झाल्याचे निदर्शनास आले असून एका गावातील लाभार्थाचे नाव दुसऱ्या गावात गेल्याने (घोळ) अडचण निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने उक्त लाभार्थ्यांना योजनेचा लाभ त्वरीत मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०२-२०२३) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) ग्रामपंचायत जैतापुर मधील लाभार्थ्यांच्या संगणकीकृत याद्यांमध्ये झालेल्या अदलाबदली बाबतच्या तांत्रीक अडचणीचे निराकरण करण्यात आले असुन, श्रीम. उज्वला शंकर गीरकर यांना घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे व त्यानुसार पहिला हप्ता रक्कम रु. १५,०००/- दि. १९.०९.२०२२ रोजी त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मरवडे, बोराळे, आंधळगाव (ता.मंगळवेढा ,जि.सोलापूर ) येथील आरोग्य केंद्रातंर्गत आरोग्य सेवा मिळण्यास होत असलेली गैरसोय

**(३४) ४७५५८ (११-१०-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरवडे, बोराळे, आंधळगाव (ता.मंगळवेढा ,जि.सोलापूर) येथील आरोग्य केंद्रातंर्गत येणाऱ्या गावातील मृतदेहांवर शवविच्छेदन करणे गैरसोयीचे होत असल्याची बाब माहे, मे २०२२ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिल कार्यलयात मा.पालकमत्र्यांच्या उपस्थितीत माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये झालेल्या कोरोना आढावा बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी या आरोग्य केंद्रातंर्गत येण्या-या गावामधील नागरीकांच्या आरोग्यासंदर्भात तसेच मृतदेहाच्या शवविच्छेशन करण्यासंदर्भात येण्या-या अडचणी सादर करुनही त्या अद्यापही न सोडविण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०१-२०२३) :** (१) हे अंशत खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र मरवडे, बोराळे, आंधळगांव ता. मंगळवेढा जि. सोलापूर येथे शवविच्छेदनगृह उपलब्ध नाही. तथापि सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यक्षेत्रात वैद्यकीय अधिका-यामार्फत तात्काळ स्पॉट शवविच्छेदन करण्यात येते. तसेच मंगळवेढा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, सलगर व भोसे या ठिकाणी शवविच्छेदनगृह उपलब्ध असून तेथे शवविच्छेदन करण्यात येते. तसेच सदरील तिन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रे ग्रामीण रुग्णालय जवळ असल्यामुळे काही शवविच्छेदन ग्रामीण रुग्णालयात करण्यात येतात.

(२) तत्कालिन पालकमत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६.०२.२०२१ रोजी तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार मंगळवेढा तालुक्यातील शवविच्छेदनगृह उपलब्ध असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र, सलगर व भोसे येथील वैद्दकीय अधिका-यांना विनाविलंब शवविच्छेदन करण्याबाबत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय बैठकामध्ये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात प्रत्येक जिल्ह्यात राज्य कर्मचारी विमा महामंडळाचे (ई.एस.आय.सी) किमान ३० बेडचे एक रुग्णालय उभारण्याबाबत

**(३५) ४७६०६ (०९-११-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगारांना तसेच इतर गरजवतांना तातडीची वैद्यकीय मदत मिळावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात राज्य कर्मचारी विमा महामंडळाचे (ई.एस.आय.सी) किमान ३० बेडचे एक रुग्णालय उभारण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२२ च्या तिस-या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामंडळाच्या दहा किलोमिटर पुढे एक रुग्णालय ही अट काढण्यात येणार असून लोकसंख्या तसेच आवश्यकतेनुसार रुग्णालय उभारण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबतचा आराखडा शासनाने तयार केला आहे काय,
(४) असल्यास, या आराखड्यानुसार व कार्यरत असण्या-या रुग्णालयांना शासनाने पुरेसा निधी देऊन ही रुग्णालये अद्यावत तंत्रज्ञानाने जोडणे तसेच मंजूर असलेली कर्मचारी व इतर मुलभूत सेवा सुविधा शासन देणार आहे काय,
(५) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०२-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या "राज्य कामगार विमा अधिनियम १९४८" अन्वये श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मार्फत "राज्य कामगार विमा योजना" राबविली जाते. सदर योजने अंतर्गत नोंदणीकृत विमाधारक व लाभार्थींना राज्य शासनामार्फत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.

प्रत्येक जिल्ह्यात राज्य कर्मचारी विमा महामंडळाचे (ई.एस.आय.सी.) किमान ३० बेडचे एक रुग्णालय उभारण्यात येणार असल्याची बाब खरी नाही. तथापि, राज्य कामगार विमा महामंडळाच्या दि.१८.०६.२०२२ व दि.१९.०६.२०२२ रोजी संपन्न झालेल्या १८८ व्या बैठकीमध्ये पनवेल (रायगड), पेण (रायगड), पालघर, सातारा, जळगाव आणि चाकण (पुणे) या ठिकाणी ०६ नवीन राज्य कामगार विमा रुग्णालये सुरु करण्यासाठी महामंडळाने मान्यता दिली आहे.
(२) नाही, हे ही खरे नाही.
(३) लागू नाही.
(४) व (५) सदर बाब ही धोरणात्मक बाब असून राज्य कामगार विमा महामंडळ मुख्यालय, नवी दिल्ली यांचेकडून या संदर्भात माहिती / मार्गदर्शक सूचना प्राप्त करण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विटा व आटपाटी (जि.सांगली) ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत.

**(३६) ४७७२१ (०९-११-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विटा व आटपाटी (जि.सांगली) येथील ग्रामीण रुग्णालयात केवळ दोनच डॉक्टर कार्यरत असून मुख्य डॉक्टर वैद्यकीय अधिक्षक यांच्यासह कर्मचाऱ्यांचीही अनेक पदे रिक्त असल्याची बाब माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०२-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
ग्रामीण रुग्णालय, विटा, जि. सांगली येथील एकूण २९ मंजूर पदांपैकी २० पदे भरलेली व ०९ पदे रिक्त आहेत. तसेच, ग्रामीण रुग्णालय, आटपाटी, जि. सांगली येथील एकूण २९ पदे मंजूर पदांपैकी २२ पदे भरलेली व ०७ पदे रिक्त आहेत.
(२) व (३)ग्रामीण रुग्णालय, विटा, जि. सांगली येथील वैद्यकीय अधिक्षक या पदावर कार्यरत अधिकारी हे दि.३१/१०/२०२१ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने सदर पद रिक्त आहे. तथापि, सदरहू रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार उपजिल्हा रुग्णालय, इस्लामपूर येथील वैद्यकीय अधीक्षकांकडे सोपविण्यात आलेला आहे.

ग्रामीण रुग्णालय, आटपाडी, जि. सांगली येथील वैद्यकीय अधिक्षक या पदावर पदोन्नतीने पदस्थापनेचे आदेश दि.०१.०८.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

सन २०२१-२२ या निवडसूची वर्षात महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने ऐकूण १५६ अधिकाऱ्यांना जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच, सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे

भरण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास एकूण १७२ पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले असून, त्यानुसार सरळसेवेच्या कोटयातुन उपलब्ध होणाऱ्या अधिकाऱ्यांमधून विटा येथील वैद्यकीय अधीक्षकाचे पद भरण्यात येईल,

तसेच, गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून, त्यामधुन विटा येथील गट-क व गट-ड मधील रिक्त पदे भरण्यात येतील

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गतचे घरकूल प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ४७७२३ (१०-११-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील ग्रामपंचायतीकडून जिल्हा परिषदेकडे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सन २०२१-२०२२ या वर्षासाठी सहा हजार ७१ घरकुलांचे प्रस्ताव प्राप्त झाले नसल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरचे प्रस्ताव सादर न करण्याची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उक्त प्रस्ताव तातडीने सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात केलेल्या खरेदीतील आर्थिक गेरव्यवहार**

**(३८) ४७९६७ (०७-११-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे जिल्हा आरोग्य अधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी (श्री घोडके), औषध निर्माण अधिकारी (श्री. जोशी) यांनी दि. १६/०७/२०२१, २४/०९/२०२१, १९/१०/२०२१ व ११/११/२०२१ या कालावधीत आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांविरोधात नागरिकांकडून केलेल्या तक्रारीसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे वारंवार माहिती मागवुनही सदर माहिती वा खुलासा त्यांना अद्याप पाठविण्यात आला नसल्याचे यापुर्वी अनेकदा निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक व कुटूंब कल्याण सोसायटी, झेडपीआर, जिल्हा वार्षिक योजना, साथरोग (कोरोना-१९), लेखाशीर्ष २२१०, ई-६५१ व ६४२ याअंतर्गत तसेच इतर लेखाशीर्षाद्वारे खरेदी करण्यात आलेली औषधे कोणत्या निकषावर खरेदी केली, त्यासाठी घेण्यात आलेली संचितका मान्यता, झालेले लेखापरिक्षण अहवाल दरपत्रके, जेम्स पोर्टल, गव्हर्नमेंट रेट कॉन्ट्रॅक्ट इ. प्रकरणी शासन आदेशांना डावलून सुमारे ६ कोटीपेक्षा अधिक रक्कमेची देयके संगनमताने कंत्राटदारांना अदा करुन गैरव्यवहार करण्यांत आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अधिकाऱ्यांच्या कार्यालयीन सर्व संचिका मान्यता, नियमबाह्य खरेदी या सर्व प्रकरणी बाह्य यंत्रणेमार्फत सविस्तर चौकशी करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद, मा. गृहमंत्री महोदय, मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा. ग्रामविकास मंत्री, संचालक, आरोग्य सेवा, पुणे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड यांचेकडे त्यांचे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारासच्या पत्रान्वये केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रकरणी केलेल्या खरेदीतील आर्थिक गैरव्यवहाराबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०१-२०२३) :** (१) महितीची मागणी करण्यात आली, हे खरे आहे. त्यानुसार लोकप्रतिनिधींनी मागितलेल्या माहितीच्या सर्व कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा संच सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने संबंधितांस उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) जिल्हा परिषद, बीड येथील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडील अहवालानुसार अनियमितता आढळून आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विष्णुपुरी ( जि. नांदेड) येथील कै.डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रुग्णालयात आरोग्य सेवे अभावी रुग्णांची होणारी गैरसोय**

**(३९) ४८३३२ (०७-११-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विष्णुपुरी ( जि. नांदेड) येथील कै.डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, इतर कर्मचारी यांची रिक्त पदे, तंत्रज्ञानाचा अभाव तसेच अपुरा औषध पुरवठा इत्यादी कारणामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात सर्व सोयी- सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री आवास योजना (ग्रमिण) च्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(४०) ४८४३६ (०९-१०-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामिण) अंतर्गत ग्रामिण भागात घरकुल बांधकामासाठी मनरेगातील अकुशल कामांच्या रु.१८ हजार सह एकुण रु.१.५० लक्ष अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मजूरीचे व बांधकाम साहित्याचे वाढलेले दर यामुळे पंचायत समिती परिसरात बांधण्यात येत असलेल्या डेमो हाऊसला प्रत्यक्ष रु.२.५० लक्ष खर्च येत असतांना लाभार्थ्यांना केवळ रु १.५० लक्ष मिळत असल्याने अनेक घरकुलांचे बांधकाम अपुर्ण असल्याचे माहे जून,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी आरमोरी, जि. गडचिरोली यांनी दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे घरकुल बांधकामासाठी रु.२.५० लक्ष अनुदान उपलब्ध करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामिण) च्या अनुदानात राज्य शासनाद्वारे केंद्र शासनाच्या हिस्स्याशिवाय वाढ करुन रु. २.५० लक्ष अनुदान उपलब्ध करण्याच्या लोकप्रतिनीधींच्या मागणीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०२-२०२३) :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) प्रधानमंत्री आवास योजना (गामीण) अंतर्गत घरकूलासाठी रक्कम रु. २.२० ते २.५० लक्ष रक्कम मंजुर करणे बाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला असता केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०२.१२.२०२० च्या पत्रान्वये अशी कुठलीही वाढ करता येत नाही असे कळविले आहे.

त्यानंतर वेळोवेळी प्राप्त झालेल्या संदर्भाचे विश्लेषण करुन दिनांक ०१.०८.२०२२ रोजी घरकुलाची रक्कम रु. ३ लक्ष करण्याबाबतचे पत्र केंद्र शासनास पाठविले असून केंद्र शासनाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यत कुष्ठरोगाचे उच्चाटन करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(४१) ४८४५६ (११-१०-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या तीन वर्षात म्हणजे दिनांक १ जानेवारी २०१९ ते ३१ जानेवारी २०२२ या कालावधीत ४४,७०७ नवीन कुष्ठरोग रुग्णांचे निदान झाले असून त्यापैकी २४,१३० पुरुष व २०,५७७ महिला कुष्ठरोगी असल्याचे दिनांक १ एप्रिल २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शहरापेक्षा आदिवासी आणि ग्रामीण भागामध्ये कुष्ठरुग्ण अधिक आढळून आले असून चंद्रपूर, पालघर, वर्धा,उस्मानाबाद, नांदेड, कोल्हापूर, गोंदिया, गडचिरोली येथे या आजाराच्या रुग्णांची संख्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुष्ठरोगाचे मुळापासून उच्चाटन करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय

**डॉ. तानाजी सावंत (०२-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे,

मुख्यत्वेकरून चंद्रपूर (४४५२), गडचिरोली (२७६५), गोंदिया (१३४६) व नांदेड (११८४) या आदिवासी व ग्रामीण जिल्हयात कुष्ठरुग्ण अधिक आढळून आले आहेत.

(३) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाअंतर्गत केंद्र सरकारने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार समाजातील सर्व कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधुन त्यांना त्वरित औषधोपचाराखाली आणले जाते. तसेच राज्यस्तरावरुन व जिल्हास्तरावरुन कार्यक्षेत्रामध्ये नियमितपणे संनियंत्रण केले जाते.

कुष्ठरोगाला आळा घालण्यासाठी कार्यक्षेत्रात खालील उपाययोजना करण्यात येत आहेत-

• विविध माध्यमांव्दारे जनसामान्यांपर्यंत कुष्ठरोगाबाबतची शास्त्रोक्त माहिती देवून कुष्ठरोगाच्या तपासणीसाठी स्वत:हून पुढे येण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

• शहरी भागात अवैद्यकीय सहाय्यक व ग्रामीण भागात आरोग्य कर्मचारी, आशा यांच्या मार्फत संशयित रुग्ण शोधण्यात येतात. निदाननिश्चिती झालेनंतर त्वरीत बहुविध औषधोपचार दिला जातो.

• नवीन शोधलेल्या सर्व कुष्ठरुणांच्या सर्व सहवासितांची तपासणी केली जाते. सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये म्हणून या सर्व सहवासितांना रिफांम्पीसीन या गोळीची एक मात्रा दिली जाते.

• शाळेतील विद्यार्थ्यांना कुष्ठरोगविषयक आरोग्य शिक्षण दिले जाते.

• सन २०१६-१७ पासून दरवर्षी “कुष्ठरुग्ण शोध मोहिम व स्पर्श कुष्ठरोग जनजागृती मोहिम” राबविण्यात आली. या मोहीमेमध्ये आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार देण्यात आला.

• शुन्य कुष्ठरोग आढळलेली गावात पुन्हा सर्वेक्षण करण्यात येत आहे.

• सन २०२०-२१ व सन २०२१-२२ मध्ये सक्रिय कुष्ठरुग्ण शोध व नियमित संनियंत्रण ही कृती राबविण्यात आली. सदर कृतीमध्ये अति जोखमिच्या भागात सर्वेक्षणाच्या २ फेऱ्या व कमी जोखमीच्या भागात सर्वेक्षणाची १ फेरी राबविण्यात आली व आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार त्वरीत सुरू करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई.जि. बीड. येथे दंतशास्त्र विभागात सुविधा उपलब्ध करून देणे बाबत

**(४२) ४८६०३ (०७-०७-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई. जि. बीड येथील दंतशास्त्र (डेंटल) विभागात बाहय रुग्ण विभागात (ओ.पी.डी) कृत्रिम दंतरीपन, फिक्स दात बसविणे, व्हाईट मेटल, सिरॅमिक व झिरकोनिया, कवळी बसविणे (इंडियन वच इंपोर्टेड), आर.सी.टी करणे इ. सुविधा देण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, रुग्णालयात एकच सोनोग्राफीची मशीन असल्यामुळे रुग्णाचा नंबर येईपर्यंत ब-याचवेळा रुग्णालय बंद होत असल्यामुळे त्याच रुग्णाला दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले जात असल्यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने आणखी एक सोनोग्राफी मशीन वाढवून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिध यांनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालयातील सोनोग्राफी मशिन तसेच दंतशास्त्र ( डेंटल) विभागतील बाहय रुग्ण विभागात सायी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०९-०३-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) नाही.
रुग्णालयातील वाढती रुग्णसंख्या विचारात घेऊन बधीरीकरणशास्त्र विभागातील एक सोनाग्राफी मशीन क्ष-किरणशास्त्र विभागाला उपलब्ध करुन दिली आहे. आता क्ष-किरणशास्त्र विभागात २ सोनोग्राफी मशीन कार्यरत आहेत. तसेच, दंतशास्त्र विभागातील बाह्यरुग्ण विभागात आर.सी.टी. (Root Canal) करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयाला पूर्णवेळ अधीक्षक नेमण्याबाबत

**(४३) ४८७३८ (११-१०-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद)येथील उपजिल्हा रुग्णालयास पूर्णवेळ अधीक्षक नसल्याने रुग्णास उत्कृष्ट सोयी-सुविधा व आरोग्य सेवा मिळणे कठिण झाले असल्याची बाब दिनांक १२ जून २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे येणाऱ्या भाविक भक्तांची संख्या लाखों मध्ये आहे तसेच तुळजापूर जवळून राज्य मार्ग व राष्ट्रीय मार्ग जात असल्याने अपघातग्रस्त रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने या रुग्णालयाची आरोग्य यंत्रणा सुसज्ज ठेवण्यासाठी सक्षम अधिकारी असणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तुळजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी पूर्णवेळ अधीक्षक नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२८-११-२०२२) :**(१) हे खरे नाही,

उप जिल्हा रुग्णालय, तुळजापूर येथील नियमित वैद्यकीय अधिक्षक हे दिनांक ०३.०६.२०२२ रोजी नियतवयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने, सदर पदाचा कार्यभार सेवा जेष्ठतेनुसार पद्व्युत्तर पदवी अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलेला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास एकूण १७२ पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले असून, त्यामधून उपलब्ध होणाऱ्या अधिकाऱ्यांमधून उप जिल्हा रुग्णालय, तुळजापूर येथील वैद्यकीय अधीक्षकाचे पद भरण्यात येईल.

उप जिल्हा रुग्णालय, तुळजापूर येथील वर्ग-२, वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या मंजूर १०७ पदांपैकी ८९ पदे भरण्यात आलेली आहेत. त्याचबरोबर, राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कंत्राटी तत्वावर १२ वैद्यकीय अधिकारी, ०८ स्टाफ नर्स, ०३ औषध निर्माण अधिकारी, ०२ तंत्रज्ञ व ०१ समुपदेशक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उप जिल्हा रुग्णालय, तुळजापूर येथे दाखल होणाऱ्या रुग्णांना उत्कृष्ट सोयी सुविधा व आरोग्य सेवा नियमितपणे उपलब्ध करुन देण्यात येत असुन, रुग्णांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बेंबळी (जि.उस्मानाबाद) येथील ग्रामीण रुग्णालयाबाबत

**(४४) ४८७४७ (११-१०-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंबळी (जि.उस्मानाबाद)येथील ग्रामीण रुग्णालय तत्काळ सुरु करावे अशी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधीनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे संपुर्ण बांधकाम झालेले असून केवळ फर्निचर व लाईट, फिटींग व इतर किरकोळ कामे करणे बाकी राहिलेले असून कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे गेल्या २ वर्षापासून विनावापर असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील ग्रामीण रुग्णालय त्वरीत सुरु करण्यासाठी लागणारा निधी, अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यावही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०३-०२-२०२३) :** (१) होय.

(२) ग्रामीण रुग्णालय, बेंबळी येथील इमारतीचे स्थापत्य काम व विद्युत काम पूर्ण झालेले असून अग्निप्रतिबंधक उपाययोजनेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर रुग्णालय इमारत सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांचेकडून हस्तांतरित करण्यात येईल व तद्नंतर रुग्णसेवा सुरु करण्यात येत आहे.

(३) शासन निर्णय, दि.२३.०६.२०२२ अन्वये ग्रामीण रुग्णालय, बेंबळी येथे २६ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शेलू (ता.कर्जत, जि.रायगड)) येथील ग्रामतलाव सांडपाण्याच्या विळख्यात सापडल्याबाबत

**(४५) ४८८०९ (०९-१०-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलू (ता.कर्जत जि.रायगड) येथील रेल्वे स्टेशनच्या परिसरातील इमारतीमधील सांडपाणी कुंपणाबाहेर सोडल्याने तेथील गावतलावातील पाणी दुषीत झाल्याचे माहे जून,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेलू ग्रामपंचायतीने तीन वर्षापूर्वी तलावातील दोन हजार ब्रास गाळ काढूनही तलावात दुषित पाण्याचा हिरवागार तवंग निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त तलाव साफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०२-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
शेलु ग्रामपंचायतीने तीन वर्षांपूर्वी शेलु (ता. कर्जत जि. रायगड) येथील गावतलावातील गाळ काढलेला नाही. तथापि, माहे जून, २०२२ मध्ये सदर तलावामध्ये हिरवे शेवाळ आढळून आले होते. ग्राम पंचायतीने ड्रोनद्वारे औषध फवारणी करून व मजूर लावून हिरवे शेवाळ काढून सदर तलाव साफ केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टाकळी (ता. तेल्हार, जि.अकोला) येथील ग्रामपंचायतीचे अभिलेखे (रेकॉर्ड) मिळत नसल्याबाबत**

**(४६) ४८९९३ (०९-११-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकळी (ता. तेल्हार, जि.अकोला) येथील ग्रामपंचायतीचे अभिलेख मिळत नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गटविकास अधिकाऱ्यांकडे टाकळी ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड मिळत नसल्याबाबत तक्रार स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांच्या स्तरावरुन प्राथमिक चौकशी करण्यात आली असून पुढील कार्यवाही त्यांचे स्तरावर सुरु आहे.
सदर प्रकरणी काही तत्कालिन ग्रामसेवक यांचे पंचायत समिती अकोट येथे स्थानांतर झाल्याने गट विकास अधिकारी, पं.स., तेल्हारा यांच्या मार्फत संबंधित दोषी कर्मचारी यांच्याविरुध्द नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच संबंधित जबाबदार तत्कालिन ग्रामसेवक श्री. ए.पी.मोहोकार, श्री. के.आर. जवंजाळ, श्री. ए.जी. माहुलकर यांची एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता थांबविण्याबाबत गट विकास अधिकारी, पं.स., अकोट यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांडगाव व लिंपणगाव (ता.श्रीगोंदा,जि.अहमदनगर) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रस्तावासंदर्भात**

**(४७) ४९४१७ (११-१०-२०२२). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांडगाव व लिंपणगाव (ता.श्रीगोंदा,जि.अहमदनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०२-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे, प्रस्ताव आयुक्तालय स्तरावर प्राप्त आहे.
(२) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित जोडबृहत आराखडयाव्दारे नव्याने आरोग्य संस्था निर्मितीसाठी लोकसंख्या व अंतराची निकषाची पडताळणी सेटेलाईट मॅपिगव्दारे MRSAC हया शासकिय संस्थेमार्फत करण्यात येवुन जोडबृहत आराखडा तयार करण्यात येणार आहे. सदयसस्थितीत MRSAC संस्थेमार्फत राज्यातील सर्व आरोग्य संस्थांचे अचूक मॅपींग करण्याकरीता Health GIS हा Mobile app विकसित करण्यात आले आहे. त्यानुसार सदर ॲपमध्ये अधिनस्त असलेल्या सर्व आरोग्य संस्थाची माहिती समाविष्ट करण्याबाबत जिल्हयांना कळविले आहे. सदरची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सुरु केलेला प्रेरणा प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत**

**(४८) ४९४९७ (२१-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सन २०१५ मध्ये शासनाने आत्महत्याप्रवण १४ जिल्ह्यात ‘प्रेरणा’ प्रकल्प सुरू केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेळेत वेतन मिळत नसल्याच्या कारणामुळे १४ पैकी १२ जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी नोकऱ्या सोडल्या असून फक्त दोनच जिल्ह्यात ‘प्रेरणा’ प्रकल्प सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात यंत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०१५ पासून मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्हयांमध्ये “प्रेरणा प्रकल्प शेतकरी समुपदेशन आरोग्य सेवा कार्यक्रम” राबविण्यात येत आहे. त्याचा विस्तार करुन केंद्र शासनाच्या जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम हा राज्यातील सर्व ३४ जिल्हयात राबविण्यात येत असुन या अंतर्गत मानसिक आरोग्याशी संबंधित सेवा पुरविण्यात येत आहेत. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांना मानसोपचार तज्ञांमार्फत प्रशिक्षण देवून “मनशक्ती क्लिनीक” सुरु करण्यात आले आहेत.

प्रेरणा प्रकल्प शेतकरी समुपदेशन आरोग्य सेवा कार्यक्रमांतर्गत गावातील आशांमार्फत सर्वेक्षण करण्यात येूवन नैराश्यग्रस्त लोकांचा शोध घेण्यात येतो तसेच आजाराच्या स्वरुपानुसार मानसिक उपचार व संदर्भ सेवा देण्यात येतात. केंद्र शासनाच्या मदतीने १४४१६ या टोल फ्री क्रमांकावरुन टेलीमानस उपक्रमांतर्गत मनोविकारांबाबत समुपदेशन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या शहरी भागातील अंगणवाडयांचे भाडे थकविल्याबाबत

**(४९) ४९५१२ (२०-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शहरी (नागरी) भागातील अंगणवाडयांचे गेली ६ तर काही ठिकाणी १० महिन्यांचे भाडे थकल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून घरमालक अंगणवाडी सेविकांकडे भाडयाच्या पैश्याची मागणी करीत असल्याने अनेक सेविका स्वखर्चाने सदर भाडे भरत असल्याचे देखिल निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अंगणवाडयांच्या मुलभूत सुविधांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडयांचे भाडे शासनाकडून भरण्यास विलंब होत असल्याची कारणे काय आहेत,

(४)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (३०-०१-२०२३):** (१) केंद्र पुरस्कृत योजनांकरिता निधी वितरणाची कार्यवाही SNA प्रणालीमार्फत करावयाची असल्याने माहे एप्रिल, २०२२ पासून अंगणवाडी भाडे थकित राहिलेले आहे.

(२) हे खरे नाही.

अंगणवाडी मुलभूत सुविधांबाबत अंगणवाडी इमारत बांधकाम, श्रेणीवर्धन, अंगणवाडी केंद्रांकरिता शौचालय बांधकाम तसेच अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे, जल जीवन मिशन अंतर्गत अंगणवाडी केंद्रांना नळाद्वारे पाणी पुरवठा इत्यादी सुविधा केंद्र व राज्य शासनाच्या निधीमधून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या आदर्श अंगणवाडी योजनेअंतर्गत, अंगणवाडी दुरुस्ती, रंगरंगोटी, त्याचप्रमाणे वीजविरहीत वॉटर प्युरिफायर, सौरउर्जा, रंगीत टिव्ही इत्यादी साहित्य उपलब्ध निधीमधून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सन २०२२-२३ केंद्र पुरस्कृत पोषण- २.० सक्षम अंगणवाडी या नविन योजने अंतर्गत राज्यातील चार आकांक्षित जिल्हे (उस्मानाबाद, वाशिम, गडचिरोली, नंदुरबार) मधील अंगणवाडी केंद्रांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून सक्षम अंगणवाडी बनविण्यात येणार आहे.

(३) व (४) एकात्मिक बाल विकास योजनेतंर्गत अंगणवाडी केंद्रांचे भाडेकरिता केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा याचे प्रमाण ६०:४० असे आहे.

केंद्र शासनाने SNA (Single Nodal Agency) प्रणाली सुरू करण्याबाबत कळविलेले आहे. त्यानुसार अंगणवाडी केंद्र भाडे SNA प्रणालीमार्फ़त अदा करणे आवश्यक आहे. SNA कार्यपध्दतीनुसार प्रथमतः राज्यस्तरावर Single Nodal Account उघडणे, तसेच जिल्हास्तर व प्रकप स्तरावर योजनानिहाय स्वतंत्र Account उघडणे, अंगणवाडी केंद्र इमारत भाडेतत्वावर देणाऱ्या घरमालकांचे PFMS पोर्टलवर Vendor Registration करणे, त्याकरिता आवश्यक कागदपत्रे (नाव, बॅंक खाते क्रमांक, आधार कार्ड, पॅन कार्ड, ई- मेल आयडी इ.) संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच घरमालकांचे बॅंक खाते SNA प्रणालीमध्ये मॅप करणे इ. प्रक्रिया पार पाडावी लागत असल्याने त्यास काही कालावधी लागत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सर्वसधारण सेवांकरिता निधी वितरीत करण्यात आला असून त्यापैकी अंगणवाडी भाडे देयकांकरिता रु. १५ कोटी निधी राखीव ठेवण्यात आला आहे. विभागीय उपायुक्त (महिला व बाल

विकास) यांचेमार्फत नागरी प्रकल्पांचे अंगणवाडी भाडे अदा करणेसाठी वित्तीय मर्यादा (Limit Set) निश्चित करण्यासाठी प्रस्ताव येत आहेत त्याप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून २४ तासाच्या आत पारित करुन आयुक्तालयस्तरावरुन Limit Set करुन देण्यात येत आहेत. त्यानुषंगाने अंगणवाडी केंद्रांचे भाडे अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली (जि.पुणे) तालुका अंतर्गत खडकवासला विधानसभा क्षेत्रातील ग्रामपंचायत घेरा सिंहगडचे दोन ग्रामपंचायतीमध्ये विभाजन करणेबाबत**

**(५०) ४९६६४ (१९-०१-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) तालुका अंतर्गत खडकवासला विधानसभा क्षेत्रातील ग्रामपंचायत घेरा सिंहगडचे दोन ग्रामपंचायती मध्ये विभाजन करण्याची मागणी होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या गावांतील ग्रामस्थांची प्रशासकीय कामांसाठी गैरसोय होत असून या ग्रामपंचायतीमध्ये सध्या ४ महसुली गावे (थोपटेवाडी, सांबरेवाडी, घेरा सिंहगड, मोरदरवाडी) मिळून २१ वाड्या वस्त्या अस्तित्वात असून सन २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामपंचायत घेरा सिंहगडची लोकसंख्या १९४८ असून आजमितीला ती जवळपास २५०० च्या आसपास असल्याने प्रशासकीय कामे वेळेवर करण्यास मोठा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर गावांतील प्रशासकीय गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०२-२०२३) :** (१) (२) व (३)
घेरा सिंहगड (ता. हवेली, जि. पुणे) ग्रामपंचायतीमध्ये घेरा सिंहगड (आतकरवाडी), मोरदरवाडी, सांबरेवाडी व थोपटेवाडी अशा चार महसूली गावांचा समावेश आहे. घेरा सिंहगड ग्रामपंचायतीचे विभाजन करुन घेरा सिंहगड व मोरदरीवाडी मिळून घेरा सिंहगड नं.१ व थोपटेवाडी व सांबरेवाडी मिळून घेरा सिंहगड नं.२ अश्या दोन ग्रामपंचायती स्थापन करण्याबाबत सरपंच व ग्रामसेवक यांनी विभाजन प्रस्ताव पंचायत समितीला सादर केला.
तथापि, ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ नुसार ग्रामपंचायत विभाजन/ एकत्रिकरण/स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासंबंधीचे निकष, अटी व शर्ती विहीत केलेल्या आहेत. त्यानुसार दोन गावात ३ कि. मी. पेक्षा जास्त अंतर असल्यास किमान लोकसंख्या एक हजार असणे आवश्यक आहे.
उपरोक्त गावांची लोकसंख्या शासन निर्णयातील लोकसंख्येच्या निकषात बसत नसल्याने सदरचा प्रस्ताव पंचायत समिती हवेली यांचेकडून ग्रामपंचायत घेरा सिंहगड यांना परत पाठविण्यात आला आहे. त्यामुळे याबाबत शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.